Thyrocare®
Think Thyroid. Think Thyrocare.

**THYROCARE TECHNOLOGIES LIMITED**
**REGISTERED OFFICE:** D-37/1, TTC Industrial Area, MIDC, Turbhe, Navi Mumbai - 400 703.
**CORPORATE OFFICE:** D-37/3, TTC Industrial Area, MIDC, Turbhe, Navi Mumbai - 400 703.

**CIN No.U85110MH2000PLC123882**
**Website:** www.thyrocare.com | **Email:** investor_relations@thyrocare.com

# १६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची, दूरस्थ ई-मतदान आणि बुक क्लोझरची सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की,

१. कंपनीची १६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार, सप्टेंबर १२, २०१६ रोजी २.३० वाजता हॉटेल योगी मिडटाऊन, प्लॉट क्र. डीएक्स-१२, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, मुंबई-पुणे रोड, तुर्भे, नवी मुंबई - ४०० ७०५ येथे सर्व भागधारकांना पाठविलेल्या सभेच्या सूचनेमध्ये देण्यात आलेल्या साधारण आणि विशेष व्यवसायासंबंधी विचार करण्यासाठी घेण्यात येणार आहे.

२. वार्षिक सर्वसाधारण सभेच्या आणि २०१६ साठीच्या वार्षिक अहवालाच्या इलेक्ट्रॉनिक प्रती सर्व अशा सभासदांना पाठविण्यात आल्या आहेत ज्यांचे ई-मेल आयडींची नोंदणी कंपनी/डिपॉझिटरी पार्टिसिपंट (टन्स) यांच्याकडे आहे. संमत प्रकाराद्वारे वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि २०१६ करिताचा वार्षिक अहवालाच्या प्रत्यक्ष प्रती सर्व अन्य सभासदांना त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यांवर पाठविण्यात आल्या आहेत. वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना पाठविण्यचे काम ऑगस्ट २०, २०१६ रोजी पूर्ण झाले आहे. वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि वार्षिक अहवाल २०१६ हे कंपनीच्या **www.thyrocare.com** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

३. सभासद ज्यांच्याकडे कट ऑफ म्हणजेच सप्टेंबर ५, २०१६ अनुसार प्रत्यक्ष स्वरूपात किंवा डिमटेरियलाइज स्वरूपात भाग आहेत, असे सर्व सभासद वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेमध्ये नमूद करण्यात आलेल्या साधारण आणि विशेष व्यवसायांच्या सर्व बाबींवर वार्षिक सर्वसाधारण सभेच्या ठिकाणांशिवाय कोणत्याही ठिकाणाहून सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेडच्या दूरस्थ ई-मतदान प्रणालीद्वारे इलेक्ट्रॉनिक मतदान करू शकतात. ('दूरस्थ ई-मतदान). सर्व सभासदांना माहिती देण्यात येते की :

i) वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेमध्ये देण्यात आलेल्या साधारण आणि विशेष व्यवसायाच्या सर्व बाबींवर इलेक्ट्रॉनिक पद्धतीद्वारे मतदानाने विचार करण्यात येईल.

ii) दूरस्थ ई-मतदान शुक्रवार, सप्टेंबर ०९, २०१६ रोजी ९.०० वाजता सुरू होईल.

iii) दूरस्थ ई-मतदान रविवार, सप्टेंबर ११, २०१६ रोजी ५.०० वाजता समाप्त होईल.

iv) वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करण्यासाठीची पात्रता ठरविण्यासाठी सप्टेंबर ०५, २०१६ हा कट ऑफ दिनांक निश्चित करण्यात आला आहे.

v) सप्टेंबर ११, २०१६ रोजी ५.०० वाजल्यानंतर इलेक्ट्रॉनिक पद्धतीद्वारे ई-मतदान करता येणार नाही.

vi) कोणीही व्यक्ती, ज्यांनी कंपनीचे भाग धारण केले आहेत आणि वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना पाठविल्यानंतर जे सभासद झाले आहेत आणि कट ऑफ दिनांक म्हणजेच सप्टेंबर ०५, २०१६ नुसार भागधारक झाले आहेत त्यांनी सूचनेमध्ये नमूद करण्यात आलेली ई-मतदानासाठीची प्रक्रिया अवलंबावी;

vii) सभासदांनी नोंद घ्यावी की : **अ)** दूरस्थ ई-मतदानप्रणाली सीडीएसएलद्वारे सप्टेंबर ११, २०१६ रोजी ५.०० वाजल्यानंतर काढून टाकण्यात येईल आणि सभासदाद्वारे ठरावावर एकदा मतदान करून झाल्यानंतर ते बदलता येणार नाही; **ब)** वार्षिक सर्वसाधारण सभेच्या ठिकाणी मतदानपत्रिकेद्वारे मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. **क)** सभासद ज्यांनी वार्षिक सर्वसाधारण सभेपूर्वी दूरस्थ ई-मतदानाद्वारे मतदान केले आहे, ते सभेला उपस्थित राहू शकतील; मात्र पुन्हा मतदान करू शकणार नाहीत; आणि **ड)** व्यक्ती जिचे नाव कट ऑफ दिनांकानुसार डिपॉझिटरीजद्वारे नोंद करण्यात येणाऱ्या लाभार्थी मालकांच्या नोंदवहीमध्ये किंवा भागधारकांच्या नोंदवहीमध्ये नोंदवण्यात आली आहेत असे दूरस्थ ई-मतदानाच्या सुविधेने किंवा वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये मतदान पत्रिकेद्वारे मतदान करण्यास पात्र ठरतील.

viii) वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना कंपनीच्या **www.thyrocare.com** आणि सीडीएसएलच्या **www.cdslindia.com** या संकेतस्थळावरसुद्धा उपलब्ध आहे.

ई-मतदानासंदर्भात कोणतेही प्रश्न किंवा समस्या असल्यास, तुम्ही फ्रिक्वेंटली आस्क्ड क्वेश्चन्स ("एफएक्यू") चा आणि **www.evotingindia.com** वर उपलब्ध असलेल्या ई-मतदानाचे मॅन्युअलचा संदर्भ घेऊ शकता. जे हेल्प सेक्शनच्या अंतर्गत पाहता येईल किंवा ***helpdesk.evoting@cdslindia.com*** वर ई-मेल पाठवा.

सभासद टोल फ्री क्र. १८००२००५५३३ वर किंवा श्री. राकेश दळवी, उपव्यवस्थापक, १६ वा मजला, फिरोझ जिजीभॉय टॉवर्स, दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई- ४०० ००१, *ई-मेल* - ***helpdesk.evoting@cdslindia.com*** वर ई-मतदानासंदर्भातील समस्यांसाठी संपर्क करू शकतात.

४. कंपनीच्या सभासदांची नोंदवही आणि भाग हस्तांतरण वही सप्टेंबर ०५, २०१६ पासून सप्टेंबर १२, २०१६ पर्यंत (दोन्ही दिवस धरून) बंद ठेवण्यात येईल.

**थायरोकेअर टेक्नोलॉजिस लिमिटेड**करिता
सही/-
रामजी दोराई
कंपनी सचिव

ठिकाण : नवी मुंबई
दिनांक : २०.०८.२०१६